**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि. १२ मार्च २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १६२/२०२३ भादंविसक २७९,३०४ (अ),सह मोवाकाक १८४,१३४ (अ) (ब) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २६/०२/२०२३ रोजी २०.४५ वा.मेंगाने नगर कॅनॉलच्या पुढे बार्शी कडून सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०३/२०२३ रोजी १३.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अतिश साहेबराव कुचेकर,वय-३० वर्षे,रा- जय मल्हार नगर बार्शी रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | छोटा हत्ती क्रिम रंगाचा वाहन क्र एमएच १३ सीयू ९५५९ चा चालक नाव पत्ता माहित नाही. |
| **मयताचे नाव** | | बाळगंगाधर ऊर्फ गौरव कुमार तुळसे वय-३० रा मेगा नगर बार्शी रोड सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील दि २६/०२/२०२३ रोजी २०.४५ वा. च्या सुमारास यातील फिर्यादीचा मावस भाऊ बाळगंगाधर ऊर्फ गौरव कुमार तुळसे वय-३० रा मेगा नगर बार्शी रोड सोलापूर व फिर्यादी असे मिळून घराकडे चालत जात असताना नमुद ठिकाणी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील छोटा हत्ती क्रिम रंगाचा वाहन क्र एमएच १३ सीयू ९५५९ ही हयगयीने वेगाने अविचाराने चालवून फिर्यादीचा मावस भाऊ यास धडक दिल्याने त्याचे डोकीस जबर दुखापत होवून त्याचेवर सिव्हील हॉस्पीटल येथे उपचार चालू असताना तो मृत्यू पावला आहे तसेच त्याचे मृत्यूस नमुद छोटा हत्ती चालक हा कारणीभूत झाला आहे.म्हणून. तपास:- पोसई भोईटे- **७९७२११९७५१** |

## विजापूर रोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १४१/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०३/२०२३ रोजी ११.३० वा ते १८.३० वा.१०४,सिल्वर ओक बिल्डीग श्री जिम च्या खाली नवीन आरटीओ ऑफिर्ड्री समोर विजापूर रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०३/२०२३ रोजी १४.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रसाद विजय जाधव,वय-२६ वर्षे,रा-८०,घनं १८३८ रामवाडी सोलापूर. |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २०,०००/- रु राखाडी रंगाची हिरो एच एफ डिलक्स मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी व्ही १६७० ही वरील ठिकाणी पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीशिवाय चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ १०४२/ सोनार- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १७०/२०२३ भादंविसक ३५३,३३२,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ११/०३/२०२३ रोजी १७.०० वा.चे सुमा.ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर. |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०३/२०२३ रोजी २०.४५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोहेकॉ/१४८२/रशिद रमजान बाणेवाले,नेम- ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अशोक सिद्राम सोनकांबळे,तत्कालीन दुरूस्ती लिपीक भूमिअभिलेख कार्यालय अक्कलकोट सध्या-नेम- आवक जावक लिपीक भूमिअभिलेख कार्यालय कवठेमहांकाळ जि सांगली रा प्लॉट नं १४७,मल्लिकार्जुन नगर हत्तुरे वस्ती सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी कार्यालयात जावक रजिस्टरमध्ये नोंदी घेत बसले असताना यातील आरोपी हा कार्यालयात मोठयामोठयाने ओरडून तुझ्याकडे दिलेल्या अर्जाचे काय झाले मी तुला अर्ज दिला आहे तु मला लेखी दे असे म्हणून आरडाओरडा करून काम करीत असलेल्या जावक रजिस्टर टेबलवरून ओढून जमीनीवर टाकून सरकारी कामात अडथळा निर्माण करून फिर्यादीस शिवीगाळ करून तुला बघुन घेतो,तुझ्यावर खोटी केस करतो असे म्हणून फिर्यादीची शर्टाचे गच्ची धरून अंगावर हात उगारून झटापट करून शिवीगाळ करून दमदाटी केली आहे. म्हणून. तपास:- पोसई माळी- ८८८८८५२०९७ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | १७१/२०२३ भादंविसक १२० (ब),४२०,४६७,४६८,४७१,३४ सह अनूसुचित जाती आणि जमाती का क ३ (२) (व्ही) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | सन २०१४ पासनू ते दि ०४/०२/२०२२ या कालावधीत जनकल्याण मल्टिस्टेट को.ऑप क्रेडिट सोसायटी लि.सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १२/०३/२०२३ रोजी ०१.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | अमृत केशव पडवळे,वय-३५ वर्षे,रा- ३३६,रामपूर खेडपाडा,पो.स्टे घोलवड ता.डहाणू जि.पालघर. |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अमर विजय जाधव,रा-५६/१५०२,सीवूड इस्टेट नेरूळ नवी मुंबई, २) यशवंत वसंतराव पाटील,रा- बी/५०१,डी विंग ऑर्चिड मेट्रोपोलिस एस.जी.बर्वे मार्ग,अलीदादा इस्टेट,कुर्ला, ३) राजेंद्र पुंडलिक हजारे,रा-घरनं ०१,लोकमंगल विहार पाण्याच्या टाकी जवळ बाळे सोलापूर. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील अरोपीत मजकूर यांनी आदिवासी इसमाचे नावावर असलेल्या जमीनी हया आदिवासी व्यतिरिक्त इतर इसमांना लिलावाशिवाय डायरेक्ट खरेदी करता येत नाही हे माहित असतांना अशा आदिवासी इसमांच्या जमीनी कमी पैश्यात लिलावाव्दारे खरेदी करण्यासाठी त्यांनी आपसात संगणमत व कट करून फिर्यादी हा आदिवासी मागासवर्गीय समाजाचा आहे हे त्यांना माहित असल्यामुळे त्यांनी फिर्यादीस प्रथम नोकरी लावतो महिना २५,०००/- रूपये देतो कंपनीचा डायरेक्टर करतो असे अमिष दाखवून कर्जत,डहाणु, चिंचलखैरे येथील आदिवासी जमीनी फिर्यादीचे नावावर,त्यांचे पैश्यांने खरेदी केल्या त्यानंतर त्या जमीनी त्यांना कमी पैश्यात लिलावाव्दारे खरेदी करता याव्यात यासाठी प्रथम कर्जत येथील आदिवासी जमीनीवर फिर्यादीचे नावे,कागदपत्रात चुकीच्या नोंदी करून नियमाबाहय व तातडीने १ कोटी १० लाख रूपये गहाण कर्ज,जनकल्याण मल्टिस्टेट,को.ऑप,क्रेडिट सोसायटी लि सोलापूर या बॅकेकडून फिर्यादीचे परस्पर मंजूर करून घेतले त्यानंतर सदरची कर्ज रक्कम बनावट विड्रोल स्लिप व बनावट रक्कम हस्तांतरण पत्राचे आधारे,यशवंत पाटील यांचे बॅक खात्यात फिर्यादीचे परस्पर जमा केली,तसेच वर नमुद आरोपीत यांनी सदरची कर्जत येथील जमीन कमी पैश्यात लिलावाव्दारे विकत घेण्यासाठी सदरचे कर्ज प्रकरण एन.पी.ए करून त्यांचे अंमलबजावणीसाठी फिर्यादीस पनवेल दिवाणी न्यायालयाची नोटीस पाठवून फिर्यादीने न घेतलेले १ कोटी १० लाख रूपये कर्जाची रक्कम फिर्यादीस परतफेड करण्यासाठी फिर्यादीवर दडपण आणुन फिर्यादीची गैरहानि करून फसवणूक केलेली आहे.म्हणून. तपासः- सपोआ श्रीमती प्रांजली सोनवणे.- **९९२२६४११३२** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | १३८/२०२३ भादंविसक ४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २८/०२/२०२३ रोजी १०.३० वा ते दि ०१/०३/२०२३ रोजी फिर्यादीचे राहते घरी, |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि ११/०३/२०२३ रोजी २२.३४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | शारदा बाबुराव कोष्टी,वय-५०वर्षे,रा-२१,सिध्दरामेश्वर वस्ती विनायक नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | एक अनोळखी इसम,वय अंदाजे ३५,मध्यम बांध्याचा खुरटी दाढी मिश्या असलेला साडेपाच फुट उंचीचा रंगाने सावळा इसम. |
| **फसवणुक र** | | ६०,०००/- रू त्यात रोख रक्कम व एक तोळे सोनेचे गंठण |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व तिचे पती असे मिळून फिर्यादीचा चुलत भाऊ चंद्रकांत कोष्टी याच्या मुलीच्या लग्नाकरीता हासरगुंडगी ता.इंडी राज्य कर्नाटक येथे गेले होते लग्न झाल्यानंतर घरी येत असताना इंडी रेल्वे स्टेशन येथे नमुद आरोपी मजकूर भेटला असून त्यांच्यात बोलणे सुरू झाले असता फिर्यादीने त्यास मुलाचे लग्न होत नसल्याने सांगितले होते त्यावर आरोपीने लग्नाकरीता मुली बघतो असे सांगून त्याचा मो.क्र ९९८०८३७८१६ हा नंबर दिला होता फिर्यादीने त्यास फोन केला असता दि २८/०२/२०२३ रोजी १३.३० वा चे सुमारास आरोपीने फिर्यादीस तुमच्या घरातील कोणीतरी करणी केली आहे पुजा करावी लागेल म्हणून पुजेची मांडणी केली आणि पुजेला घरातील पैसे |

| | | |
|---|---|---|
| | | ठेवण्यास सांगितले म्हणून फिर्यादीने रोख रक्कम १५,०००/- रूपये ठेवले होते त्यांनतर सदरचे पैसे ब्लाऊज पिसमध्ये बांधण्यासा सांगितले आणि जाताना ब्लाऊज पिस मधील पैसे रूमालामध्ये बांधून स्वत:कडे ठेवले व निघून गेला दि ०१/०३/२०३ रोजी आरोपीने मो.क्र ६३६०८९१२६६ यावरून फोन करून फिर्यादीस नवी पेठमध्ये बोलावले तेथे गेलेवर चांदणी सिल्क साडी सेंटरमध्ये नेवून सहा साडया घेतल्या व आणखीन मोठी पुजा करावी लागेल त्यासाठी पुजाला सोने ठेवावे लागेल असे सांगितले त्यावर फिर्यादीने विश्वास ठेवून गळयातील सोन्याचे गंठण काढून दिले व त्यावर आरोपीने सदरची पूजा सिध्देश्वर मंदिर येथे करावी लागेल असे सांगितले व निघून गेला व परत आला नाही तसेच दि ०३/०३/२०२३ रोजी आरोपीने फिर्यादीस फोन करून मंदिरात पुजा करीत आहे असे सांगितले व दोन्ही नंबर बंद केले त्यावर फिर्यादीची खात्री झाली की आरोपीने फिर्यादीचे मुलाच्या लग्न जुळवीण्याचे आमिष दाखवून पुजेकरीता ठेवण्यास दिलेले रोख रक्कम व सोने घेवून जावून फसवणुक केले आहे.म्हणून. तपास:- पोसई रजपूत- |